# वसई विरार शहर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय विरार (पुर्व), जि. पालघर पिन नं 401305**
**दुरध्वनी** – 0250-2525101/02/03/04/05/06, **फॅक्स** – 0250-2525107
**ई-मेल** vasaivirarcorporation@yahoo.com

**विभाग : मुख्यालय लेखा विभाग**

**प्रशासकीय ठराव क्र.**.596 **दिनांक :** 10/03/2021

**प्रस्तावाचा विषय :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 96 व 100 अन्वये वसई विरार शहर महानगरपालिकेचे अ व क अंदाजपत्रकाचे सन सन 2020-21 चे सुधारीत व सन 2021-22 चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाज मा. प्रशासक यांनी विचारात घेऊन स्विकृतीबाबत निर्णय घेणे.

**प्रस्तावाचा मजकुर :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 96 व 100 मधील तरतुदीप्रमाणे मा. प्रशासक यांनी सन 2020-21 च्या सुधारीत अर्थसंकल्पासह सन 2021-22 चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक अंतिमरित्या स्विकृतीसाठी पी बजेट चे अंदाज, जेंण्डर बजेटचे अंदाज व दिव्यांग कल्याण योजनांचे अंदाज यासह सर्वसाधारण अ अर्थसंकल्प, जल मल प्रवाह निधी क अर्थसंकल्प, वृक्ष प्राधिकरण अर्थसंकल्प, कर्ज निधी अर्थसंकल्प, सॅटेलाईट सिटी/ अमृत योजना विशेष निधी योजना अर्थसंकल्प याबाबत आयुक्त यांनी सादर केलेली लेखाशिर्ष निहाय तपशिलवार माहिती, अंदाज व प्रस्ताव विचारात घेऊन विचार विमर्षानंतर अंतिमरित्या स्विकृती बद्दल योग्य तो निर्णय घेण्याबद्दल निर्देश दिले आहेत.

**निर्णय :-** पी बजेट, जेण्डर बजेट व दिव्यांग कल्याणाचे बजेटसह सर्वसाधारण अ अर्थसंकल्प, जल मल प्रवाह निधी क अर्थसंकल्प, , वृक्ष प्राधिकरण अर्थसंकल्प, कर्ज निधी अर्थसंकल्प, सॅटेलाईट सिटी/ अमृत योजना /विशेष निधी योजना अर्थसंकल्प याबाबतचे सन सन 2020-21 चे सुधारीत व सन 2021-22 चे मुळ अंदाज तयार करतांना दि. 3/3/2021 ते दि. 10/3/2021 या कालावधीत सर्व विभाग व मा. लोकप्रतिनिधी यांचेशी सविस्तर चर्चा व विचार विमर्ष करुन सोबत जोडलेल्या प्रपत्र एक प्रमाणे फेरबदलासह शिफारशी केल्या आहेत.

प्रपत्र एक मधील शिफारसी स्विकृत करण्यात येत असून तदनंतर होणारा अर्थसंकल्पीय गोषवारा खालीलप्रमाणे असेल. अर्थसंकल्पीय गोषवाऱ्यात नमुद केलेले अर्थसंकल्पीय अंदाज अंतिमरित्या स्विकृत करण्यांत येत आहेत. त्याप्रमाणे अर्थसंकल्पीय पुस्तीकेत योग्य ते बदल करुन अर्थसंकल्पीय पुस्तीका पुढील कार्यवाहीसाठी सर्व विभागांना वितरीत करण्यास व प्रसिध्द करण्यास या ठरावाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

**अर्थसंकल्पीय गोषवारा** (रु. कोटीत)

| लेखाशिर्ष | सुधारीत अर्थसंकल्प सन 2020-21 | मुळ अर्थसंकल्प सन 2021-22 |
|---|---|---|
| प्रारंभिक शिल्लक | 726.09 | 563.02 |
| जमा रकमा | 1144.65 | 1437.26 |
| प्रारंभिक शिलकेसह एकूण जमा रकमा | 1870.74 | 2000.28 |
| खर्च रकमा | 1307.72 | 1962.96 |
| अखेर शिल्लक | 536.02 | 37.31 |
| अखेरच्या शिलकेसह एकूण खर्च रकमा | 1870.74 | 2000.28 |

XXX/-
(डी.गंगाथरन, भा.प्र.से.)
मा. प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

## प्रपत्र एक

## सन 2020-21 चे सुधारीत व सन 2021-22 चे मुळ अंदाजपत्रकातील फेरबद्दलाबाबत टिपणी

| | |
|---|---|
| 1 | प्रस्तावाचे वाचन करतांना अर्थसंकल्पातील मुद्रणदोष दुरुस्त करण्यांत आले. |
| 2 | दहन दफन भुमी दुरुस्तीसह इतर खर्च सन 2021-22 मध्ये रु. 7.30 कोटी तरतुदी ऐवजी 3.50 कोटी करण्यांत आली आहे. |
| 3 | सर्वसाधारण नियमीत रस्ते दुरुस्ती व विकसीत करणे. सन 2020-21 मध्ये रु. 40.00 कोटी तरतुदी ऐवजी 55.00 कोटी करण्यांत आली आहे. तसेच सन 2021-22 मध्ये रु. 30.00 कोटी तरतुदी ऐवजी रु. 35.00 कोटी करण्यांत आली आहे |
| 4 | सर्वसाधारण नियमीत विविध योजनांतर्गत रोड रिस्टोरेशन सन 2020-21 मध्ये रु.18.49 कोटी तरतुदी ऐवजी 25.00 कोटी करण्यांत आली आहे. . तसेच सन 2021-22 मध्ये रु. 10.00 कोटी तरतुदी ऐवजी रु. 20.00 कोटी करण्यांत आली आहे. |
| 5 | मध्यवर्ती वाचनालय (इमारत बांधकामासह) व्यवस्था सन 2021-22 मध्ये रु. 1 हजार तरतुदी ऐवजी रु. 1.00 कोटी करण्यात आली आहे. |
| 6 | शहरांतर्गत उड्डाणपूल (रॅम्प ब्रिज व इतर ब्रिज) सन 2021-22 मध्ये रु 20 कोटी तरतुदी ऐवजी रु. 10 कोटी करण्यात आली आहे. |
| 7 | रात्र निवारा शेड सन 2020-21 मध्ये रु 3.51 कोटी तरतुदी ऐवजी रु. 90 लक्ष करण्यात आली आहे. |
| 8 | कोंडवाडा सर्वेक्षण, आरक्षण व कोंडवाडा बांधकाम सन 2021-22 मध्ये रु. 1 कोटी तरतुदी ऐवजी रु. 50 लक्ष करण्यात आली आहे. |
| 9 | महात्वाच्या ठिकाणी दिशा दर्शक फलक व स्वागत कमाने उभारणे/ वाहतुक बेट तयार करणे. सन 2021-22 मध्ये रु 2 कोटी तरतुदी ऐवजी रु. 50 लक्ष करण्यात आली आहे. |
| 10 | क्रिडांगण विकासासाठी भुसंपासदनासह क्रिडा संकुल/ स्टेडीयम बांधकाम व वालीव येथील क्रिडागणासह इतर क्रिडांगण विकासाच्या बाबी (5% क्रिडा राखीव तरतुद) सन 2020-21 मध्ये रु. 5 कोटी ऐवजी रु. 10.27 कोटी करण्यात आली असून सन 2021-22 मध्ये रु 20 कोटी तरतुदी ऐवजी रु. 40 कोटी करण्यात आली आहे. |
| 11 | पे & पार्क वाहनतळ उभारणे. सन 2021-22 मध्ये रु 2 लक्ष तरतुदी ऐवजी रु. 1.50 कोटी करण्यात आली आहे. |
| 12 | श्वानशाळा विकसीत करणे. सन 2021-22 मध्ये रु 1 लक्ष तरतुदी ऐवजी रु. 1 कोटी करण्यात आली आहे. |
| 13 | वि.नि.अं. रस्ता बांधकामे .. सन 2021-22 मध्ये रु 15 कोटी तरतुदी ऐवजी रु. 10 कोटी करण्यात आली आहे. |
| 14 | वि.नि.अं. उद्यान विकास. सन 2021-22 मध्ये रु 13.50 कोटी तरतुदी ऐवजी रु. 20 कोटी करण्यात आली आहे. |
| 15 | एकात्मिक दहन व दफन भुमी विकास कार्यक्रमांतर्गत नवीन दहन व दफनभुमीसाठी भुसंपादन व विकासासह अस्तित्वातील दहन व दफन भुमींचा विकास तसेच विद्युत व गॅस दाहिनी व्यवस्था. सन 2021-22 मध्ये रु 5 कोटी तरतुदी ऐवजी रु. 9.15 कोटी करण्यात आली आहे. |
| 16 | सार्वजनिक शौचालय, मुतारी/प्रसाधन गृह दुरुस्ती. सन 2021-22 मध्ये रु 2.50 कोटी तरतुदी ऐवजी रु. 1.50 कोटी करण्यात आली आहे. |
| 17 | गटारावर चेंबर्स बांधणे व चेंबर्स व्यवस्था. सन 2021-22 मध्ये रु 12 कोटी तरतुदी ऐवजी रु. 15 कोटी करण्यात आली आहे. |
| 18 | मुख्य मलनि:स्सारण वाहिनीला इमारतीच्या मलनि:स्सारण वाहिनीची जोडणी करणे. सन 2021-22 मध्ये रु 10 कोटी तरतुदी ऐवजी रु. 5 कोटी करण्यात आली आहे. |

| | |
|---|---|
| 19 | सा.प्र. कर्मचारी वेतन भत्ते. सन 2020-21 मध्ये रु. 22.55 कोटी तरतुदी ऐवजी रु. 17.55 कोटी करण्यांत आली आहे. |
| 20 | जंतू नाशक- खरेदी. . सन 2020-21 मध्ये रु. 9.98 कोटी तरतुदी ऐवजी रु. 1.00 कोटी करण्यांत आली आहे. |
| 21 | साफसफाई साहित्य खरेदी (मनपा मालमत्ता व डस्टबिन खरेदी). . सन 2020-21 मध्ये रु. 9.69 कोटी तरतुदी ऐवजी रु. 1.00 कोटी करण्यांत आली आहे. |
| 22 | ठेवीचा परतावा. . सन 2020-21 मध्ये रु. 30.00 कोटी तरतुदी ऐवजी रु. 25.20 कोटी करण्यांत आली आहे. |
| 23 | सुर्या योजना पाण्याचे देयक. . सन 2020-21 मध्ये रु. 5.73 कोटी तरतुदी ऐवजी रु. 6.73 कोटी करण्यांत आली आहे. |
| 24 | घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत अनुदानासह रस्ता, गटारे, नाले, सार्वजनिक ठिकाणे इ. साफसफाईसाठी घंटा गाडी, यांत्रीक झाडू उपलब्ध करणेसह सफाई ठेका व भाडयाच्या वाहनाद्वारे यांत्रिक पध्दतीने नाले सफाई सन 2020-21 मध्ये रु. 160.43 कोटी तरतुदी ऐवजी 163 कोटी करण्यांत आली आहे. |
| 25 | विकास कामाव्यतिरिक्त प्रभाग समिती स्तरावरुन केल्या जाणाऱ्या व्यवहारासाठी विविध लेखाशिर्षातर्गत उपलब्ध असणा-या तरतूदी सद्दस्थितीत समप्रमाणात विभागणी करून नियंत्रण ठेवणेत यावे व आवश्यकतेनुसार मा. आयुक्त साो. यांचे निर्देशाने त्या-त्या लेखार्शिषातंर्गत एकूण उपलब्ध तरतुदीच्या मर्यादेत प्रभागांतर्गत फेरफार करणे विशेष बाब म्हणून अनुज्ञेय राहील. |
| 26 | विकास कामांसाठी निधीची कमतरता व आस्थापना खर्चाचे अनुज्ञेय मर्यादा विचारात घेऊन तद्नुसार उत्पन्न व खर्च नियंत्रीत करणेच्या दृष्टीने ठोस प्रयत्न करणेस शिफारस करणेत आली. |
| 27 | अर्थसंकल्पातसोबत सादर केलेल्या सबसीडी अहवालासह इतर सहपत्र तसेच आयुक्त यांनी अंतीमत: मान्य करुन शिफारस केलेल्या लेखाशिर्षनिहाय तरतुदींचा तपशील अर्थसंकल्पाच्या प्रतीत नमुद करणेत आला असून सदरअर्थसंकल्पाची प्रत हा या ठरावाचा भाग मानला जाईल. |
| 28 | आगामी वर्षात देखील 5 वर्षाचा मालमत्ता कर आगाऊ भरणाऱ्या मालमत्ता धारकांना मालमत्ता करात 15 % दराने प्रोत्साहनपर सवलत देण्याची तरतुद आहे. परंतू सदर मागणी बीलाचा भरणा हा त्यांनी बिल मिळाल्यापासून 15 दिवसांत करणे आवश्यक आहे. तसेच भविष्यात मालमत्ता करात किंवा इतर करांमध्ये वाढ झाल्यास त्या कराच्या रकमेच्या फरकाचा भरणा मालमत्ता धारकास करावा लागेल. |
| 29 | स्वातंत्र्य सैनिक व आजी माजी सैनिक त्यांच्या पश्चात त्यांची विधवा पत्नी हयात असेपर्यत त्यांच्या राहत्या स्वमालकीच्या अधिकृत निवासी सदनिकेस वेळोवेळीच्या मागणी नुसार मालमत्ता करात 100 % सुट आहे. |
| 30 | नव्याने विकसित केल्या जाणा-या मालमत्तांसाठी रेन वॉटर हार्वेस्टिंग योजनेची अंमलबजावणी सक्तीने चालू असून यामुळे नविन इमारतींना रेन वॉटर हार्वेस्टींगची व्यवस्था झाली आहे. त्यामुळे भुगर्भातील पाण्याची पातळी वाढणेस मदत झाली आहे व होत आहे. सबब अस्तित्वात असणाऱ्या सध्याच्या मालमत्तांबाबत महानगरपालिकेच्या संमतीने रेन वॉटर हार्वेस्टींग प्रकल्प अंमलात आणणाऱ्या मालमत्ता धारकांना प्रोत्साहन देणेकामी मालमत्ता करामध्ये सामान्य पाणीपट्टीचा भाग समाविष्ट असल्याने मालमत्ता कराच्या 2% सवलतीसह योजना खर्चाच्या 20 % परंतू अधिकतम रु. 1 लक्ष इतका खर्च अनुदान अदा करणेची तरतूद आहे. |
| 31 | निसर्ग ऋण प्रकल्प राबविण्यासाठी एकत्रित मालमत्ता कराच्या 2% सवलतीसह योजना खर्चाच्या 20 % परंतू अधिकतम रु. 1 लक्ष इतका खर्च अनुदान अदा करणेची तरतूद आहे. |

XXX/-
मुख्य लेखा व वित्त अधिकारी
वसई विरार शहर महानगरलिका